

उद्योजकांच्या सर्व समस्या सोडविणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

e Paper


दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 12/01/२०२५ METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 20 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com


# अपघातग्रस्तांची मदत करणाऱ्यांना बक्षीस, केंद्राचा मोठा निर्णय !



मुंबई : अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्तांच्या मदतीला कोणीही येत नाही, त्यामुळे अपघातग्रस्तांचा मृत्यू अटळ असतो परंतु आता या अपघातग्रस्तांना मदत करणाऱ्यांना बक्षीस देण्यात येण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या वतीने घेण्यात आला आहे याबाबतचा महत्त्वाचा निर्णय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी घेतला आहे. रस्त्यावर एखादा अपघात झाल्यास इतर वाहनचालक तो अपघात पाहूनही तिथे न थांबता आपल्या मार्गाने निघून जातात. बरेचजण आपला वेळ जाईल म्हणून तिथे थांबून अपघातग्रस्तांची मदत करत नाहीत. तर काहीजण पोलिसांना देखील अपघाताची माहिती देत नाहीत. पोलीस आपल्याकडे चौकशी करत बसतील, त्याचा मनःस्ताप सहन करावा लागेल, पोलीस आपल्यालाच या अपघातात अडकवतील या भितीने लोक अपघातग्रस्तांची मदत करणं टाळतात. लोकांची ही सवय बदलण्यासाठी आणि त्यांना माणुसकी दाखवत अपघातग्रस्तांची मदत करायला प्रवृत्त करण्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कोणीही अपघातग्रस्तांची मदत केली तर केंद्र सरकार त्यांना आता २५ हजार रुपये बक्षीस म्हणून देणार आहे. देशात सुरक्षित प्रवासाला चालना मिळावी आणि अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळून त्यांचे प्राण वाचवता यावेत यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे.

# आंतरराज्यीय टोळीतील सराईत गुन्हेगारांना अटक !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वाकड : पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये मागील काही महिन्यांपासून महागड्या कार चोरी घटनांमध्ये वाढ झाली होती. सदरचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मार्फत विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेमध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाला यश आले आहे. सुमारे ६० लाख रुपये किमतीच्या कार हस्तगत करण्यात आल्या आहेत.




## ६० लाख रुपये किमतींच्या कार हस्तगत

तसेच महागड्या कार चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे. अल्ताफ अत्तर (वय ४०, रा.मामुर्डी, देहू रोड) जुबेर कुरेशी (वय ३४, रा. मेरठ, रा. उत्तर प्रदेश), मुसाहिद खान (वय ३१, रा.हरियाणा), जानीशार अली (वय ३८, रा. मध्य प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कार चोरी करणारी ही आंतरराज्यीय टोळी मधील आरोपी हे हुंडाई कंपनीचे सन २०२१ पासून सन २०२३ मधील ऑटोमॅटिक बटन स्टार्ट डिझेल क्रेटा कारचा आरोपी अल्ताफ अत्तर हा स्थानिक रहिवासी असल्याने त्याला पिंपरी चिंचवड परिसराची चांगली ओळख होती, तसेच मुसाहिद खान हा हुंडाई कंपनीचे गाड्यांचा एक्सपर्ट मेकॅनिक असून त्याला विशेषतः क्रेटा कार संबंधात विशेष माहिती होती. त्याने गाड्या चोरी करण्यासाठी सोबत कानपूर येथून हुंडाई कंपनीच्या विविध मॉडेलच्या बनावट चाव्या सोबत ठेवल्या होत्या. चोरीसाठी टार्गेट केलेल्या गाडीची ड्रायव्हर साईडची काच फोडून त्याच्याकडे असलेल्या ओबीडी स्कॅनर डिव्हाइस द्वारे गाडीची चावी मॅच करून डिवाइस द्वारे नवीन चावीला ॲक्सेस देऊन पाच ते दहा मिनिटात गाडी चालू करून वाहने हे पळवीत असायचा.

त्यांच्याविरोधात पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीतील एकूण ७ व नवी मुंबई आयुक्तालयाच्या हद्दीतील दोन अशा एकूण ९ कार चोरी करणारी आंतरराज्य टोळीतील सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून एकूण ५४ लाख ६३ हजार ३१० रुपये किमतीच्या तीन हुंडाई क्रेटा कार ,एक किया सेंटॉस, स्कॅनर की मेकर ,स्क्रू ड्रायव्हर , एकूण ४० चाव्या, त्यामध्ये हुंडाई कंपनीच्या १४ चाव्या, मारुती कंपनीच्या ९ चाव्या, किया कंपनीच्या ६ चाव्या, टोयोटा कंपनीच्या ४ चाव्या, महिंद्रा कंपनीच्या ३ चाव्या, फोर्ड कंपनीच्या २ चाव्या, टाटा कंपनीच्या ३ चाव्या, वेगवेगळ्या नंबर प्लेट व एकूण ५ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे.सदरची कामगिरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे विनय कुमार चौबे ,सह पोलीस आयुक्त डॉ.शशिकांत महावरकर ,अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी ,पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड ,सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली निवृत्ती कोल्हटकर, सुभाष चव्हाण, अनिरुद्ध सावर्डे, बिबीशन कन्हेकर, संदीप गवारी, वंदू गिरे, ज्ञानदेव झेंडे ,कवतेय खराडे, सौदागर लामतुरे, तात्यासाहेब शिंदे ,नामदेव वडेकर ,विजय भुसारे, सचिन गायकवाड,रामचंद्र तळपे ,विजय घाडगे, दीपक साबळे ,मंगेश लोखंडे यांनी सदरची कारवाई केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 12/01/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper



# उद्योजकांच्या सर्व समस्या सोडविणार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी चिंचवड लघु उद्योग संघटनेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरातील औद्योगिक आस्थापनांना येणाऱ्या विविध समस्यांबाबत निवेदन देण्यात आले, सर्व समस्यांवर भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे पिंपरी चिंचवड महानगरपालिका पीएमआरडीए एमआयडीसी पोलीस विभाग महावितरण विभाग महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळ या सर्व संबंधित विभागाचे अधिकारी तसेच पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेची संयुक्त बैठक घेऊन या सर्व समस्यांवर कायमस्वरूपी सोडविण्यासाठी लवकरात लवकर काम सुरू करू असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी चिंचवड लघु उद्योग संघटनेच्या सर्व शिष्टमंडळाला दिले. यावेळी भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे, पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष विनोद नाणेकर, सचिव जयंत कड, संचालक संजय सातव, अतुल इनामदार ,स्वीकृत संचालक रामदास जैन आदी मान्यवर उपस्थित होते लघुउद्योग संघटनेच्या वतीने अनेक समस्या मांडण्यात आल्या , या समस्यांमध्ये प्रामुख्याने पुढील प्रमाणे निवेदनात समस्या मांडण्यात आल्या आहेत.

त्यामध्ये विविध मागण्या मांडण्यात आल्या. उद्योजकांना एलबीटीची बाकी नसलेली रक्कम व्याज व शास्ती दंडासह भरण्याच्या नोटीसा पाठविलेल्या आहेत. त्यामुळे अगोदरच मेटाकुटीला आलेला उद्योजक हा आता पूर्णपणे नेस्तानाबूत होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. निवासी भागातील लघुउद्योगांचे औद्योगिक परिसरात पुनर्वसन करण्यासाठी महापालिकेने एम.आय.डी.सी. कडून १९९२ मध्ये टी-२०१ हा भूखंड घेतला होता. त्यावर प्रकल्पाचे काम



देखील सुरु केले. २५ वर्षानंतर हा प्रकल्प बऱ्यापैकी पूर्ण झाला आहे. या प्रकल्पातील गाळ्यांचा महापालिकेने ठरविलेला दर उद्योजकांना परवडणारा नाही. हा दर कमी करुन गाळे वाटपाची प्रक्रिया लवकर सुरु करावी.

महानगरपालिकेने ३१ डिसेंबर २०२० पर्यंतचे आरक्षित भूखंड, पूररेषा या जागेवरची बांधकामे वगळून उर्वरित सर्व अवैध बांधकामे ही सरसकट नियमित करावीत. एम.आय.डी.सी., पेठ क्रमांक ७ आणि १०, कुदळवाडी, चिखली, तळवडे येथील अंतर्गत रस्ते अत्यंत खराब झालेले आहे. अनेक ठिकाणी फक्त खडी टाकली आहे. त्यांचे तातडीने डांबरीकरण करावे. तसेच शहरातील

औद्योगिक पट्टयातून चाकण औद्योगिक परिसरात जातांना रस्ते अरुंद व खराब असल्यामुळे सतत बाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्य तोडगा काढावा.

या विषयावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याकरिता लवकरच आपण मा.श्री. महेशदादा लांडगे आमदार, भोसरी विधानसभा यांचेसह पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पी.एम.आर.डी.ए., एम.आय.डी.सी., पोलीस विभाग, महावितरण विभाग, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळ, या सर्व संबंधित विभागाचे अधिकारी तसेच पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटना यांची एक संयुक्त बैठक घेऊन वरील सर्व समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी लवकरात लवकर कामे चालू केली जातील असे आश्वासन मा. मुख्यमंत्री साहेब यांनी शिष्टमंडळाला दिले.

# फसवणूक केलेल्या आरोपीस मुद्देमालासह अटक!

## वाकड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वाकड : वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हा नोंद झाल्यानंतर दहा तासांच्या आत फसवणूक करून गेलेल्या आरोपीस मुद्देमालासह वाकड पोलिसांनी अटक केली आहे. सतीश शिंदे (वय २५, रा.बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून २ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा फिर्यादी यांच्या येथे चालकाची नोकरी करीत होता,फिर्यादी यांनी आरोपी सतीश कडे विश्वासाने टाटा कंपनीचा टेम्पो चालवण्यासाठी दिला होता. सतीश ने फिर्यादी यांची फसवणूक करून तो टेम्पो पळवून नेला. याची तक्रार वाकड पोलिसांकडे दाखल झाल्यानंतर दहा तासांच्या आत फसवणूक करून गेलेल्या आरोपीस अटक करण्यात आली. त्याच्याकडून दोन लाखांचा टेम्पो हस्तगत करण्यात आला.सदरची कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे पोलीस ,सहा.आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली निवृत्ती कोल्हटकर, सुभाष चव्हाण, अनिरुद्ध सावर्डे, बिभीषण कन्हेकर,



संदीप गवारी, वंदू गिरे, ज्ञानदेव झेंडे, कौतेय खराडे, सौदागर लामतुरे ,तात्यासाहेब शिंदे, नामदेव वाडेकर ,विजय भुसारे ,सचिन गायकवाड, रामचंद्र तळपे, विजय घाडगे, दीपक साबळे, मंगेश लोखंडे यांनी केली.

# 17 जानेवारी पासून पर्पल जल्लोष –दिव्यांगांचा महा उत्सव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी, दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेऊन त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी तसेच त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाउंडेशनच्या वतीने पर्पल जल्लोष –दिव्यांगांचा महाउत्सव साजरा करण्यात येणार आहे. हा तीन दिवसीय महोत्सव चिंचवड येथील ऑटो क्लस्टर प्रदर्शनी केंद्र येथे १७ , १८, १९ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. भारतातील कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे आयोजित करण्यात येणारा हा दिव्यांगांसाठीचा पहिलाच भव्य उत्सव असून दिव्यांगांच्या कल्याणासाठी उचललेले एक अग्रगण्य पाऊल असल्याचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले. पर्पल जल्लोष हा महोत्सव दिव्यांगांची प्रतिभा आणि त्यांच्या नवकल्पनांना वाव देणारा तसेच दिव्यांगांच्या क्षमतामध्ये वाढ करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या महोत्सवाचा उद्देश सामाजिक विकासातील अडथळे दूर करण्यास चालना देणे, दिव्यागांबाबत समाजात असलेल्या प्रचलित विचारांविषयी प्रबोधन करणे, दिव्यांग व्यक्तीं विषयी समाजात असलेले नकारात्मक समजबदलण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांचे सर्वांगीण समावेशन करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, हा या महोत्सवाचा हेतू असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले. पर्पल जल्लोषचे ठळक वैशिष्ट्ये सहाय्यक साधने आणि तंत्रज्ञान एक्स्पोचे आयोजन या उत्सवामध्ये दिव्यांगांसाठी कार्यरत असलेल्या ४० पेक्षा जास्त स्टार्टअप्स, विविध कार्पोरेट कंपन्या आणि विविध संस्था सहभागी होणार आहेत. याठिकाणी दिव्यांगांबाबतच्या सेवांची माहिती देणारे स्टॉल्स उभारणार असून प्रदर्शने देखील भरवली जाणार आहेत. सहभागी कंपन्याकडून दिव्यांगांसाठीच्या नवीन कल्पना, तंत्रज्ञान प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत. याशिवाय केंद्र सरकार, राज्य सरकार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने दिव्यांगांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिव्यांग व्यक्तींसह इतर नागरिकांना व्हावी यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत. शिवाय दिव्यांगांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन देखील करण्यात येणार असून त्यांच्या कौशल्यानुसार त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांची नोंदणी केली जाणार आहे. चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, फॅशन शो आणि रोजगार मेळाव्याचे आयोजन पर्पल जल्लोष महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींच्या तसेच विद्यार्थ्यांच्या कलात्मक आणि सर्जनशील कौशल्याचे प्रदर्शन तसेच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कलामंच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये दिव्यांग नृत्य, गायन, अभिनय, गझल, कविता साहित्य संमेलन, अभिनय,फॅशन शो यासारखे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. तसेच दिव्यांगांच्या जीवनावर आधारित लेखन, साहित्य त्यांच्या प्रेरणादायी कथा आणि प्रवासाचा उलगडा करणारे विशेष सत्र देखील याठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. कार्यक्रमच्या ठिकाणी दिव्यांगांच्या स्थानिक संस्थाकडून खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारण्यात येणार असून ते स्टॉल्स दिव्यांग व्यक्ती चालवणार आहेत. या स्टॉल्सच्या माध्यमातून चौपाटीवर काम करणाऱ्या सर्व दिव्यांग व्यक्तींना रोजगार मिळेल, तसेच ग्राहकांना रुचकर व स्वादिष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे.

पर्पल जल्लोष महोत्सवात विविध क्षेत्रातील कंपन्या, स्वयंसेवी संस्था, संशोधक आणि नवकल्पक विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

दिव्यांग व्यक्तींसाठी सोयीस्कर पद्धतीने आवश्यक साधनसामग्री आणि समावेशक समाज निर्माण करण्याचा उद्देश साध्य करण्यासाठी ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड (HMIL) या कंपनीने नोव्हेंबर २०२३ मध्ये 'समर्थ बाय ह्युंदाई' हा उपक्रम सुरू केला. 'मोबिलिटी' म्हणजे फक्त कार किंवा वाहतूक व्यवस्था नसून, मानवजातीच्या प्रगतीसाठी आणि प्रत्येक घटकाला संधींचे दरवाजे खुले करून समान अधिकार प्राप्त करून देण्यासाठी ह्युंदाई हा कृतीशील प्रयत्न करीत असून या विचाराने कंपनीने "पर्पल जल्लोष २०२५" साठी प्रायोजकत्व स्वीकारले आहे, असे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# 50 हजार उद्योजकांनी दिली प्लास्टो प्रदर्शनाला भेट

## प्लास्टो 2025 प्रदर्शनाची सांगता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी(प्रतिनिधी) असोशिएशन फॉर दि प्रमोशन ऑफ प्लास्टिक्सच्या वतीने चार दिवस मोशी येथे भरविण्यात आलेल्या प्लास्टो 2025 प्रदर्शनाला केंद्रीय नागरी वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दि. 11 रोजी तर महाराष्ट्र राज्याचे उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दि 10 रोजी सदिच्छा भेट दिली.या चार दिवसात सुमारे 50 हजार उद्योजकांनी भेट देवून नवीन तंत्रज्ञानाची माहिती करून घेतली.**

यावेळी श्री मोहोळ आणि श्री पाटील यांनी प्रदर्शनात सहभागी झालेले उद्योजक व अभ्यागतासोबत चर्चा केली.प्लास्टिक उद्योगाचे भरवलेले प्रदर्शन पाहुन आयोजकांचे कौतुक केले. यावेळी यावेळी अभिनेते प्रवीण तरडे,असोशिएशन फॉर दि प्रमोशन ऑफ प्लास्टिक्सचे अध्यक्ष अनिल नाईक,प्लास्टो 2025 चे अध्यक्ष अजय झोड,संयुक्त अध्यक्ष निलेश पटेल,सचिव समीर कोठारी, उपाध्यक्ष एन शंकरामन , खजिनदार प्रणव बेल्हेकर, ऍडमिन आनंद कुंभोजकर, सदस्य राज मिर्जे, गोपाळ ढगे, संजय मेहरे आदी मान्यवर उपस्थित होते.



डावीकडून समीर जोशी, रमेश परदेशी,विश्वेश कुंभोजकर,आनंद कुंभोजकर, अनिल नाईक, मंत्री मुरलीधर मोहोळ,अजय झोड,अभिजित विसपुते,प्रणव बेल्हेकर, समीर कोठारी

यावेळी संघटनेच्या वतीने ना मोहोळ आणि ना. पाटील यांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. दि. 10 रोजी संध्याकाळी पिंपळे सौदागर येथे उद्योजकांसाठी विविध कला गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कच्चा माल पुरवठादार विभागात के लॉन टेक्नो पॉलिमर कंपनीला मिलेक्रॉन इंडिया कंपनीला उत्पादन विभागातून तर बेस्ट इनोव्हेटिव्ह प्रॉडक्टसाठी गुलमोहर पॅक टेक कंपनीला पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी अभिनेता प्रवीण तरडे, अध्यक्ष अनिल नाईक यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.या प्रदर्शनामध्ये देश विदेशातील 250 कंपन्यांनी आपले उत्पादने सादर केले होते. यामुळे प्लास्टिक साठी कच्चा माल पुरवठा उद्योगवाढ , मेक इन इंडिया, नवीन स्टार्ट अप साठी उपयुक्त ठरणार आहे.अशी माहिती अध्यक्ष अनिल नाईक यांनी यावेळी दिली.

# 1200 विद्यार्थी करणार योगाचा विश्वविक्रम

## योगाद्वारे उच्च दर्जाचे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिकपटू घडवणार : मुख्याध्यापिका धनावडे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : विद्यार्थ्यांना लहान वयातच योगाची गोडी लागावी आणि त्यातून ते शारीरिकदृष्ट्या सुदृढ व बौद्धिकदृष्ट्या उन्नत व्हावे, या उद्देशाने डीईएस प्राथमिक शाळेत गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. या वेळेस क्रीडा क्षेत्रात काही अनोखे करण्याच्या उद्देशाने डीईएस प्राथमिक शाळेत दि. १८ जानेवारी २०२५ रोजी १२०० विद्यार्थी व पालक प्राचीन ते आधुनिक काळापर्यंतच्या विविध योगांचे प्रात्यक्षिक दाखवून एक विश्वविक्रम प्रस्थापित करणार आहे, अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना धनावडे यांनी एका पत्रकार परिषदेत दिली.



या विश्वविक्रमा संदर्भात सविस्तर माहिती देताना मुख्याध्यापिका धनावडे बोलत होत्या. या पत्रकार परिषदेला सीमरन गुजर, प्रोजेक्ट मॅनेजर ग्रेसी डिसूझा, क्रीडा शिक्षिका योगिनी कानडे आणि योगा उपक्रमाचे सल्लागार डॉ. मिलिंद संपगावकर आदी उपस्थित होते. शाळा समिती अध्यक्ष अंड. राजश्री ठकार यांचे ही या उपक्रमांस सहयोग लाभले आहे.

या वेळी बोलताना मुख्याध्यापिका धनावडे आणि उपस्थित शिक्षिकांनी सांगितले की, या योगा विश्वविक्रमात विद्यार्थी काल योग, सूर्यनमस्कार, चंद्रनमस्कार, ट्रायबल योगा, ॲनिमल योगा, बर्ड पोजेस, दंड योग, पार्टनर योगा, रिव्होल्यूशनरी पोजेस, तालीयोग, ऱ्हिदमिक योगा, इक्विमेंट योगा, थेरा बँड योग, ब्रिक्स योग, चेअर योगा, मेडिसनल बाॅल योगा, योगा फाॅर स्पोर्ट्स, डान्स योगा, पॅट्रियाॅटिक मंडल योग, ॲक्वा योगा, स्पिरिच्युअल योगा आणि पावर योगा सादर करणार आहेत. या कार्यक्रमात पालकांच्या ढोलताशा पथकाचे संचलन पालकांद्वारे सादर होईल. शंखनाद करून कार्यक्रमाची सुरवात होईल व त्यानंतर सरस्वती पूजन झाल्यानंतर विद्यार्थी विविध योगासने सादर करतील.

कोरोना काळानंतर विद्यार्थ्यांची रोगप्रतिकारक क्षमता वाढवण्याचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यामुळे आम्ही योगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आणि बौद्धिक दृष्ट्या तल्लख बनवण्यासाठी दोन वर्षांपूर्वी योगा क्लासेसची सुरवात केली. यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. हा विश्वविक्रमाचा उपक्रम त्याचीच एक प्रचिती आहे. या माध्यमातून आमचा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आाॅलिम्पिकपटूदेखील घडवण्याचा मानस आहे.

डाॅ. मिलिंद संपगावकर यांनी सांगितले की, १५० मिनिटांमध्ये विद्यार्थी हे ३० ॲक्टिव्हिटी सादर करतील. त्यासाठी विद्यार्थ्यांची जोरदार तयारी करण्यात आली आहे. शाळेने पालकांनादेखील यामध्ये सामावून घेतल्यामुळे आज त्याचा खूपच सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांवर झाला आहे.

# एम्प्रेस गार्डन येथे सर्वात मोठा फुलांचा शो

## डॉ.सुहास दिवसे यांच्या हस्ते उदघाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे. एम्प्रेस गार्डनचे व्यवस्थापन ॲग्री हॉर्टिकल्चर सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया करते आणि दरवर्षी जानेवारीमध्ये एम्प्रेस गार्डनमध्ये फ्लॉवर शो आयोजित केला जातो. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही 24 ते 27 जानेवारी दरम्यान पुण्यातील एम्प्रेस गार्डनमध्ये फ्लॉवर शो आयोजित करण्यात आला होता.**

या वर्षीचे फूल प्रदर्शनाचे उद्घाटन जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख डॉ. सुहास दिवस यांच्या हस्ते शुक्रवार, 24 जानेवारी रोजी दुपारी 12 वाजता होईल. या पुष्प प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण म्हणजे जपानी शैलीत बनवलेल्या विविध फुलांच्या सजावटी, विविध प्रकारच्या फुलांच्या रचना आणि स्पर्धकांनी बनवलेल्या विविध प्रकारच्या बोन्साय झाडे, जे पुष्पप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र असतील. पत्रकार परिषदेत सुरेश पिंगळे, अनुपमा बर्वे यांनी ही माहिती दिली.

पुण्यासह अनेक राज्यातील नर्सरींचा समावेश असेल

या फुल प्रदर्शनात केवळ पुण्यातीलच नव्हे तर कोल्हापूर, सांगली, नाशिक, आंध्र प्रदेश आणि देशातील अनेक रोपवाटिका व्यावसायिक उपस्थित राहतील. पुष्प प्रदर्शनात विशेष मुलांसाठी चित्रकला आणि हस्ताक्षर स्पर्धा देखील आयोजित केल्या जातात, विविध शाळांमधील सुमारे 1000 विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होतात. यावर्षी देखील, रविवार, 12 जानेवारी रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आणि हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केली जाईल.

या फ्लॉवर शोमध्ये वृद्धांचा सहभाग वाढावा यासाठी बागायतदारांसाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जात



आहेत. तसेच या प्रदर्शनात फुलांची कलात्मक मांडणी, फळे आणि भाज्यांची स्पर्धा, आकर्षक पानांच्या कुंड्या, विविध बागेच्या फुलांचे सादरीकरण देखील सर्वसामान्यांसाठी करण्यात आले आहे.

तसेच, या फ्लॉवर शो दरम्यान बागेत येणारे फूलप्रेमी नवीन सजवलेल्या एम्प्रेस गार्डनचा आनंद घेऊ शकतात. दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही, फ्लॉवर शोमध्ये विविध प्रकारच्या बागांच्या रचना, आकर्षक कुंड्यांची व्यवस्था, वेगवेगळ्या पानांसह फुलांची सर्जनशील मांडणी आणि आकर्षक फुले पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी मिळेल.एम्प्रेस गार्डनचे व्यवस्थापन ॲग्री हॉर्टिकल्चर सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया द्वारे केले जाते. यासोबतच, संस्थेच्या माध्यमातून बागेत नेहमीच अनेक वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवले जातात. सामान्य माणसामध्ये निसर्ग आणि पर्यावरणाबद्दल प्रेम निर्माण करणे आणि प्रत्येक व्यक्तीला निसर्गाचा आनंद आणि अनुभव मिळावा यासाठी ॲग्री हॉर्टिकल्चर सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया 1830 पासून काम करत आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968